ePaper

# मुख्यमंत्र्यांच्या स्थगिती धोरणाला अधिकाऱ्यांकडून आक्षेप



| वर्ष - 6 I अंक - 112 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- धरणक्षेत्रांत तुरळक पावसाची हजेरी
- रिक्षा प्रवासही महागला!
- मंत्रीमंडळ विस्तारावरून अजित पवारांची शिंदे-फडणवीस सरकारवर टीका


www.mahaenews.com | Iबुधवार Iदिनांक 27 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



खरं सांगायचं तर मला चिंता नाहीये. चिंता माझी नाहीये, शिवसेनेची तर बिलकूल नाहीये. मात्र थोडीफार चिंता आहे ती नक्कीच मराठी माणसांची, हिंदूंची आणि हिंदुत्वाची आहे. याचं कारण हिंदुद्वेष्टे, मराठीद्वेष्टे हे आपल्या घरातच आहेत. मराठी माणसांची एकजूट तुटावी, हिंदूंमध्ये फूट पडावी आणि मराठी माणसाची, हिंदूंची एकजूट करण्यासाठी जी मेहनत माननीय शिवसेनाप्रमुखांनी हयातभर केली ती आपल्याच काही कपाळकरंटय़ांच्या हातून तोडावी. याची मला चिंता आहे. **- उद्धव ठाकरे, शिवसेना**

“बाळासाहेब ठाकरे माझे वडील आहेत, माझा बाप आहे, तुम्ही तुमच्या आई-वडिलांचे फोटो लावा. उद्धव ठाकरेंना अजून कळलंच नाही की, बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील असंख्य शिवसैनिकांचे आणि लोकांचे दैवत आहेत. आपल्याच वडिलांना, आपल्याच बाळासाहेबांना किती लहान करणार? हे अजूनपर्यंत उद्धव ठाकरेंना न कळाल्यामुळे हे दिवस आले आहेत. **- नितेश राणे,** भाजपा



# प्रशासकीय गतीमानतेची ‘टिवटिव’!

## महापालिका प्रशासनाचा निर्णय : सर्व विभाग ई-मेल, ट्विटरचा वापर करणार

**पिंपरी । महाईन्यूज ।**

महापालिकेच्यावतीने विविध सेवा सुविधा उपलब्ध करुन देताना नागरी सहभाग देखील या प्रक्रीयेमध्ये असावा याकरीता महापालिका विविध संवाद माध्यमांचा प्रभावी वापर प्रशासकीय कामकाजात करीत आहे. जलदगतीने माहितीचा प्रसार आणि नागरी संवाद साधण्यासाठी आता महापालिकेचे सर्व विभाग ई-मेल बरोबरच ट्विटरचा वापर देखील करणार आहेत.

नागरिकांसमवेत सोहार्दपूर्ण नाते निर्माण करण्यासाठी ट्विटर सारखे जलद द्विसंवादी माध्यम प्रभावी ठरणार असून महापालिकेची सकारात्मक प्रतिमा उंचाविण्यासाठी ट्विटर उपयुक्त ठरेल. नागरिकांनी या माध्यमातून प्रशासनाशी संवाद साधावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी केले.

पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत मधुकरराव पवळे सभागृहात सर्व विभागप्रमुखांना ट्विटर वापरा विषयी संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, नगररचना उपसंचालक प्रसाद गायकवाड, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल रॉय, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जितेंद्र कोळंबे, मुख्यलेखापरिक्षक प्रमोद भोसले, सह शहर अभियंता रामदास तांबे, श्रीकांत सवणे, सतिश इंगळे, संजय खाबडे, ज्ञानदेव जुंधारे, वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, शशिकांत पाटील, उप आयुक्त अजय चारठाणकर, रविकिरण घोडके यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख



### नागरिकांसाठी व्हॉट्स ॲप – चॅट बॉट सुविधा...

महापालिकेने नागरिकांकरीता व्हॉटस् ॲप - चॅट बॉट प्रणालीचा वापर सुरु केला आहे. या प्रणालीवर दैनंदिन १०० पेक्षा अधिक व्यक्ती संवाद साधून आपल्या सूचना, तक्रारी आणि म्हणणे मांडतात. यामुळे प्रशासन गतीमान होण्यास मदत होत आहे. आता महापालिकेच्या सर्व विभागांचे स्वतंत्र ट्विटर अकाऊंट असणार आहे. त्यामुळे त्या विभागातील नागरिकांशी संबंधित बाबी ट्विट करुन नागरिकांना त्याबद्दल अवगत केले जाणार आहे. नागरिकांना या माध्यमातून प्रतिसाद देणारे प्रशासन म्हणून महापालिकेची ओळख होणार आहे, असेही आयुक्त राजेश पाटील यांनी म्हटले आहे.



**“लोकांसमवेत संवाद साधण्यासाठी प्रशासकीय कामकाजामध्ये विविध माध्यमांचा वापर होणे आवश्यक आहे. महापालिकेच्या योजना, सुविधा, उपक्रम आदी बाबी नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ट्विटर सारखे माध्यम वापरात आणले पाहिजे. महापालिकेचे तसेच महापालिका आयुक्त म्हणून माझे स्वत:चे ट्विटर अकाऊंट आहे. आता जागतिक पातळीवर या माध्यमाचा वापर वाढत आहे. हे संवेदनशील माध्यम असून वापरण्यास सुलभ आहे.**

**- राजेश पाटील, आयुक्त, प्रशासक, महापालिका.**

# काँग्रेसच्या जनधारामुळे सोनिया गांधींची ‘ईडी’ चौकशी

## डॉ. कैलास कदम : शहर काँग्रेसचे नाशिक फाटा चौकात सत्याग्रह आंदोलन

**। पिंपरी । महाईन्यूज ।**



मागील आठ वर्षांपासून केंद्रातील भाजप सरकारच्या हुकुमशाहीमुळे देश अराजक्तेकडे वाटचाल करीत आहे. केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे वाढती महागाई, जुलमी राजवट या विरोधात काँग्रेस वेळोवेळी रस्त्यावर येऊन सामान्यांचे प्रश्न मांडत आहे. त्यामुळे देशभर सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा जनाधार वाढत आहे. याच्या भीतीपोटी मोदी शहा यांचे जुलमी सरकार हे सोनिया गांधी यांची वारंवार ईडीच्या नावाखाली चौकशी करून नाहक त्रास देत आहे अशी टीका काँग्रेसचे शहर अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी केली.

काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना ईडी मार्फत चौकशी करून केंद्र सरकार नाहक त्रास देत आहे. सुमारे १० वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी ईडीने हे प्रकरण संपवले. आता पुन्हा हे प्रकरण पुनरुज्जीवित केले. या मोदी सरकारच्या जुल्माविरोधात आज संपूर्ण देशात सत्याग्रह केला जात आहे.

पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली नाशिक फाटा चौक, कासारवाडी येथे सत्याग्रह सुरूच ठेवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे आणि जोपर्यंत सोनिया गांधी यांना चौकशीनंतर परत येऊ दिले जात नाही तोपर्यंत आमचा सत्याग्रह सुरूच राहील असे कदम यांनी सांगितले.

या सत्याग्रह आंदोलनात माजी महापौर कवीचंद भाट, ज्येष्ठ नेत्या निगार बारस्कर, माजी नगरसेवक बाबू नायर, माजी नगरसेविका निर्मला कदम, महिला शहराध्यक्ष सायली नढे, वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, दिलीप पांढरकर, युवक अध्यक्ष कौस्तुभ नवले, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष ज्ञानेश्वर मलशेट्टी, भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, ॲड. उमेश खंदारे, सहकार सेल अध्यक्ष के. हरिनारायण, शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष अभिमन्यू दहीतुले आदी उपस्थित होते.

## शॉर्ट न्यूज »

### नाना पेठेत वैमनस्यातून तरुणाचा खून

।पुणे। महाईन्यूज ।

वैमनस्यातून तरुणावर शस्त्राने वार करुन त्याचा खून करण्यात आल्याची घटना नाना पेठेतील नवा वाडा परिसरात घडली. या प्रकरणी दोघांच्या विरोधात समर्थ पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अक्षय वल्लाळ (रा. नवा वाडा, नाना पेठ) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरण महेश नारायण बुरा, किशोर अशोक शिंदे (दोघेही रा. नवा वाडा, नाना पेठ) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अतुल गंगाधर गायकवाड (वय ३३, रा. नाना वाडा, नाना पेठ) यांनी समर्थ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अक्षय आणि आरोपी महेश, किशोर नाना पेठेतील नवा वाडा परिसरा राहायला आहेत. आरोपींशी अक्षयची काही दिवसांपूर्वी भांडणे झाली होती. अक्षय नवा वाडा परिसरातील एका इस्त्रीच्या दुकानाजवळ थांबला होता. त्या वेळी आरोपींनी त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले तसेच त्याच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू मारला.

# पुण्यात महाविकास आघाडीचे 20 नगरसेवक भाजपाच्या संपर्कात!

## राज्यातील सत्तांतरानंतर पुण्यातही उमटू लागले पडसाद

।पुणे। महाईन्यूज ।

राज्यातील राजकीय समीकरणे बदलून शिंदे-फडणवीस यांची सत्ता अस्तित्वात आल्यानंतर त्याचे परिणाम पुणे शहरातही दिसून येण्यास सुरुवात झाली आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसमधील २० ते २२ नगरसेवकांनी भाजपाकडून उमेदवारी मिळू शकते का, याची चाचपणी सुरू केली आहे.

**भाजपाच्या स्थानिक नेत्यांच्या माध्यमातून प्रवेश करण्याचा प्रयत्न सुरू –**

राज्यातील सत्तांतरानंतर पुण्यातही त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. राज्यात महाविकास आघाडीची सत्ता असताना भारतीय जनता पार्टीमधील जवळपास २० नगरसेवक शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस या तीन पक्षांच्या महाविकास आघाडी सरकारमध्ये जाण्याच्या तयारीस होते. मात्र, इतर मागासवर्गीय समाजाच्या राजकीय आरक्षणामुळे (ओबीसी) लांबलेल्या निवडणुका आणि त्यानंतर राज्याच्या राजकीय पटलावर झालेल्या घडामोडीतून झालेले सत्तांतर या सर्व घडामोडी भाजपाच्या पथ्यावर पडल्याचे तूर्तास दिसत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्याशी संपर्क साधून भाजपाच्या स्थानिक नेत्यांच्या माध्यमातून महाविकास आघाडीमधील नगरसेवकांचा भाजपामध्ये येण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने निकाली काढल्यानंतर ओबीसी आरक्षण विरहीत, अन्य आरक्षणे राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जाहीर करण्यात आली. यादरम्यान जयंत बांठिया आयोगाच्या शिफारशी सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारल्याने राज्यातील १४ महापालिकांमध्ये ओबीसी आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.



राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना भाजपामधील जवळपास १० ते १५ नगरसेवकांनी महाविकास आघाडीत आणि विशेष करून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची हालचाल सुरू केल्या होत्या. याच नगरसेवकांनी राजकीय फायद्याच्या हेतूने २०१७ च्या महापालिका निवडणुकीत भाजपामध्ये प्रवेश केला होता. हे नगरसेवक भाजपाच्या तिकीटावर निवडूनही आले. त्यानंतर या नगरसेवकांना महापालिकेत कोणतीही लाभाची पदे मिळाली नाहीत. भाजपात दाखल झालेले हे नगरसेवक तत्कालीन खासदार यांचे कट्टर समर्थक होते.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर हेच नगरसेवक घरवापसी करणार, अशी चर्चा चालू असतानाच पुन्हा एकदा राज्यात सत्तातरांचे नाट्य घडले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधून आलेले नगरसेवक पुन्हा भाजपमध्येच राहण्याचा विचार करत आहेत. त्यातच नव्याने काही कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल होण्याची चिन्हे आहेत.

### भाजपाकडून योग्यवेळी भूमिका स्पष्ट करण्यात येईल

**'महाविकास आघाडीतील बऱ्याच नगरसेकांनी भाजपशी संपर्क साधलेला आहे. मात्र, याबाबत लगेच कोणताही निर्णय घेतला जाणार नाही. भाजपाकडून योग्यवेळी भूमिका स्पष्ट करण्यात येईल,' असे भाजपाच्या सूत्रांनी सांगितले.**

# श्री एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेच्यावतीने कारगील विजय दिवस उत्साहात साजरा

## शहीद जवानांना व हुतात्मयांना विद्यार्थी-शिक्षकांच्यावतीने अभिवादन...

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

श्री एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेच्या विद्या व्हॅली इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणामध्ये कारगिल विजय दिवसाचे औचित्य साधून कारगिल युद्धाच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. यावेळी हुतात्मा राजगुरू यांच्या पुण्यभुमीतील कोये गावचे सुपुत्र कीर्ती चक्र प्राप्त, कारगिल हिरो सन्माननीय सुभेदार संतोष राळे यांच्या उपस्थितीमध्ये कारगिल विजय दिवस शहिद जवानांना मानवंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास श्री.एस.पी. देशमुख शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शामरावजी देशमुख व सचिव रोहिणी ताई देशमुख उपस्थित होत्या. विद्यालयातील सर्व शिक्षक





वृंद व प्राचार्य यांच्यावतीने सदर कार्यक्रमाचे आयोजन उत्तमरित्या करण्यात आले.

सदर कार्यक्रमांस किर्ती चक्र प्राप्त सुभेदार संतोष राळे, संस्थेचे अध्यक्ष शामराव देशमुख व सचिव रोहिणीताई देशमुख यांच्या हस्ते शहीद जवानांना मानवंदना देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यालयाच्यावतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण करण्यात आले. उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार विद्यालयाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष शामराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यालयाच्या संगीत शिक्षिका स्नेहल बेल्हेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विद्यार्थीनी तालात व सुरात देशभक्तीपर गीत गायन करून संपूर्ण वातावरण जोशपूर्ण व उत्साहीत केले. तसेच पूनम जाधव या विद्यार्थीनीने कारगिल विजय दिनाबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सुभेदार संतोष राळे यांनी भारताने आतापर्यंत केलेल्या पाच युद्धाबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच कारगिल युद्धामध्ये स्वतः सहभागी असल्याने त्यावेळी निर्माण झालेल्या अनेक कटू प्रसंगांना भारतीय सैन्य दलाने कशा पद्धतीने तोंड दिलं तसेच कारगिल युद्ध यशस्वीरित्या पूर्ण करताना अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्या सर्व अडचणींना निडरपणे भारतीय सैनिक सामोरे गेले. सुभेदार संतोष राळे यांनी आपल्या सैन्याची तुकडी सोबत कारगील युद्धात अनेक अडचणीचा सामना करत कारगिल ऑपरेशन पूर्ण करून सहीसलामत आपल्या भारत भूमीमध्ये माघारी आले. भारत सरकारने त्यांना किर्ती चक्र बहाल.करून त्यांचा गौरव केला. तसेच विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशेत सैन्य भरतीची चांगली तयारी करावी व देश रक्षणासाठी सैन्यामध्ये भरती व्हावे, अशी इच्छा व्यक्त केली. भारतीय सैन्यातील व्यक्तीला कोणत्याही इतर पदाशी त्याची तुलना होऊ शकत नाही असे संबोधन सुभेदाराने केले. सैन्य भरती संदर्भातील अनेक पैलू व्यवस्थित रित्या आपल्या मनोगतामध्ये सांगितले. विद्यालयातील परिसर व एम सी एफ चे सर्व इंस्ट्रक्टर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी सैन्य भरतीसाठी चांगली तयारी करतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

सदर कार्यक्रमास संस्थेच्या सचिव रोहिणीताई देशमुख, स्वाती रणदिवे, दीपक शिंदे, एमसीएफचे इंस्ट्रक्टर व विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने करण्यात आली व आभार प्रदर्शन कविता कानवडे या शिक्षिकेने व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे शिक्षक सोमनाथ हत्तुरे व हर्षा वैद्य यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी सर्व शिक्षक वृंद व प्राचार्य यांनी परिश्रम घेतले.

# तुमच्या आसपास अपंग राहतात, चला त्यांना मदत करूया!

## आमदार लक्ष्मण जगताप यांचे आवाहन : शुक्रवारी जयपूर फूट मोफत शिबीर

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**तुमच्या शेजारी किंवा आसपास अपंग राहत असतील तर त्यांना पुन्हा जिद्दीने उभे करण्यासाठी भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांनी मदतीचा पुढे केला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून चंद्रंग चॅरिटेबल ट्रस्ट व इनलॅक्स बुधराणी हॉस्पिटलच्या वतीने शुक्रवारी (२९ जुलै रोजी) अपंगांसाठी कृत्रिम हात व पाय (जयपूर फूट) मोफत बसवण्याचे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.**

चला तर मग तुमच्या शेजारी किंवा आसपास राहणाऱ्या अपंगांपर्यंत या शिबीराची माहिती पोहोचवून आपल्या सहकार्याची एक कुबडी त्यांना देऊ या. कदाचित याच कुबड्या खचलेल्या अनेक अपंगांच्या जीवनाला आधार देतील, असे आवाहन आमदार लक्ष्मण जगताप यांनी केले आहे.

अपंग! शब्द फक्त तीन अक्षरी. उच्चारण्यासाठी किती सहज सोपा. पण तितकाच या अपंगत्वाचा अनुभव घेणे कठीण व दु:खद. काहीजण जन्मत:च अपंग असतात तर काही अपघाताने अपंग होतात.

पण संबंध थेट अपंगत्वाशीच! कधी कधी त्या विकलांग जीवाला समाजाचा अपमान, अवहेलना सहन करावी लागते. या अवहेलनेत काही अपंग खचतात. पण अशातही काहीजण जिद्दीने पुढे जातात. त्यासाठीच भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि इनलॅक्स बुधराणी हॉस्पिटलच्या वतीने अपंगांना मदतीचा हात दिला जाणार आहे. अपंगांना कृत्रिम हात व पाय (जयपूर फूट) मोफत बसवण्यासाठी शुक्रवार २९ जुलै रोजी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पिंपळेगुरव येथील संपर्क कार्यालयात सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत हे शिबीर होणार आहे. चला तर मग तुमच्या शेजारी किंवा आसपास अपंग राहत असल्यास त्यांच्यापर्यंत या शिबाराची माहिती पोहोचवूया, असे आवाहन आमदार लक्ष्मण जगताप यांनी केले आहे.




**अपंग! शब्द फक्त तीन अक्षरी. उच्चारण्यासाठी किती सहज सोपा. पण तितकाच या अपंगत्वाचा अनुभव घेणे कठीण व दु:खद. काहीजण जन्मत:च अपंग असतात तर काही अपघाताने अपंग होतात. पण संबंध थेट अपंगत्वाशीच! कधी कधी त्या विकलांग जीवाला समाजाचा अपमान, अवहेलना सहन करावी लागते. या अवहेलनेत काही अपंग खचतात. पण अशातही काहीजण जिद्दीने पुढे जातात. त्यासाठीच भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि इनलॅक्स बुधराणी हॉस्पिटलच्या वतीने अपंगांना मदतीचा हात दिला जाणार आहे. अपंगांना कृत्रिम हात व पाय (जयपूर फूट) मोफत बसवण्यासाठी शुक्रवार २९ जुलै रोजी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.**

# पिंपरीतील आरोग्य विभागात खांदेपालट; अजय चारठाणकर नवे आरोग्यप्रमुख

## आरोग्य विभागातील 6 सहायक आरोग्य अधिकारी, 22 आरोग्य निरीक्षक, 27 सहायक आरोग्य निरीक्षक यांच्या बदल्या

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी पालिकेतील आरोग्य विभागातील ६ सहायक आरोग्य अधिकारी, २२ आरोग्य निरीक्षक, २७ सहायक आरोग्य निरीक्षक यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ. अनिल रॉय सेवानिवृत्त होत असून त्यांचा पदभार उपआयुक्त अजय चारठाणकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. महापालिकेच्या मुख्य कार्यालयाकडील कामकाजासाठी आवश्यकता असल्याचे कारण देत आरोग्य विभागातील बदल्यांचे आदेश प्रशासक तथा पालिका आयुक्त राजेश पाटील यांनी दिले आहेत. त्यानुसार, कुंडलीक दरवडे, तानाजी दाते, बाबासाहेब कांबळे या सहायक आरोग्य अधिकाऱ्यांकडे नव्या क्षेत्रीय कार्यालयाची जबाबदारी देण्यात आली आहे.

याशिवाय, शांताराम माने, महेश आढाव, राजू साबळे यांच्याकडे सहायक आरोग्य अधिकारीपदाचा अतिरिक्त पदभार सोपवण्यात आला आहे. श्रीराम गायगवाड, सतीश पाटील, सुधीर वाघमारे, राजू बेद या मुख्य निरीक्षकांची इतर क्षेत्रीय कार्यालयात बदली करण्यात आली आहे. याशिवाय २२ आरोग्य निरीक्षक, २७ सहायक आरोग्य निरीक्षकांची बदली करण्यात आली आहे. प्रशासकीय कारणास्तव या बदल्या करण्यात आल्या आहेत. कर्मचाऱ्यांनी बदली रद्द करण्याचे प्रयत्न करू नयेत, ते मान्य केले जाणार नाहीत, असे याबाबतच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.



**महापालिकेच्या मुख्य कार्यालयाकडील कामकाजासाठी आवश्यकता असल्याचे कारण देत आरोग्य विभागातील बदल्यांचे आदेश प्रशासक तथा पालिका आयुक्त राजेश पाटील यांनी दिले आहेत. त्यानुसार, कुंडलीक दरवडे, तानाजी दाते, बाबासाहेब कांबळे या सहायक आरोग्य अधिकाऱ्यांकडे नव्या क्षेत्रीय कार्यालयाची जबाबदारी देण्यात आली आहे.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये ८४ हजार; मतदारांच्या मूळ प्रभागांत बदल

## अंतिम यादीतील प्रकारामुळे गोंधळाची स्थिती

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी पालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी तयार केलेली अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर तब्बल ८४ हजार मतदारांचे मूळचे प्रभाग बदलले गेले आहेत, असे चित्र समोर आले. ही नावे आधी एका प्रभागात होती. अंतिम यादीत ही नावे नव्या प्रभागात समाविष्ट झाली आहेत. याद्यांचा बराच घोळ घालून झाल्यानंतर पिंपरी पालिकेने शनिवारी (२३ जुलै) अंतिम मतदार यादी जाहीर केली. त्यानुसार, शहरातील एकूण मतदारसंख्या १४ लाख ८८ हजार ११४ इतकी झाली.

नव्या मतदारसंख्येची नव्या स्वरूपात प्रभागनिहाय विभागणी करण्यात आली असता, वाकडऐवजी रावेत-किवळे-मामुर्डी हा सर्वाधिक (५१, ९८९), मतदारसंख्या असणारा प्रभाग ठरला असून ताथवडेऐवजी



थेरगावातील बापुजीबुवानगर प्रभागाची संख्या सर्वात कमी (२२,४१२) झाली आहे. मोशी-बोऱ्हाडेवाडी, वाकड, पिंपळे सौदागर प्रभागाची मतदारसंख्या ४० हजारांपेक्षा जास्त झाली आहे. शहरभरातील एकूण ८४ हजार १४६ मतदारांची नावे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागाच्या यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. प्रारूप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर हरकती मागवण्यात आल्या होत्या, तेव्हा सर्वाधिक हरकती याच प्रकारातील होत्या. अनेकांची नावे मूळच्या प्रभागाऐवजी इतर प्रभागात गेल्याचे दिसून आले होते. त्यामुळे बराच गोंधळ उडाला होता. यासंदर्भातील दुरुस्त्या करण्यासाठी २३ जून ते १ जुलैपर्यंत मुदत होती.

## संपादकीय »

# शक्ती नव्हे युक्ती श्रेष्ठ...

***सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांची निवृत्ती जवळ येते आहे, तसतसा त्यांच्या बोलण्यातील मोकळेपणा वाढतो आहे. ते विपुल आणि स्पष्ट बोलू लागले आहेत.***

रांची येथे न्यायमूर्ती सत्यव्रत शर्मा यांच्या स्मरणार्थ दिलेल्या व्याख्यानातही त्यांनी चौफेर विचार मांडले. या व्याख्यानात काही आत्मपर आहे, काही आठवणी आहेत. त्यात, लहानपणी खेडेगावात घेतलेले शिक्षण, सातवी-आठवीपर्यंत इंग्रजीचा नसणारा स्पर्श हे आहे; तसेच 'आपल्याला खरे तर राजकारणात जायचे होते; पण या क्षेत्रात आलो,' असेही ते म्हणाले. हे विधान सूचक आहे; मात्र न्यायाधीश म्हणून काम करताना प्रत्येक दिवशी आपल्याला समाधान मिळाले, अशी पुस्तीही त्यांनी जोडली. या प्रदीर्घ व्याख्यानात न्यायमूर्तींनी ज्या अनेक विषयांना हात घातला, त्यात मीडियाचाही समावेश होता. आजकाल मीडिया म्हटले, की 'सब घोडे बारा टक्के,' असा विचार करण्याची प्रवृत्ती बोकाळली आहे. प्रदीर्घ, उज्ज्वल परंपरा असणाऱ्या प्रादेशिक भाषा; तसेच इंग्रजीतील मुद्रित माध्यमे, उदारीकरणानंतर फोफावलेल्या वृत्तवाहिन्या, त्यानंतर गेल्या दोन दशकांत बोकाळलेली समाजमाध्यमे आणि अगदी त्रुटित संदेश जिवाच्या आकांताने पुढे पाठविणारी लघुमाध्यमे, असा हा माध्यमांचा महाकाय विस्तार झाला आहे. हा 'नावरे आवरिता' पसारा नियंत्रणात ठेवण्याची जबाबदारी जशी समाजाची; तशीच ती सरकार आणि न्यायव्यवस्थेचीही आहे. सुदैवाने, रमणा यांनी साऱ्या माध्यमांची एकच गोधडी न विणता वृत्तवाहिन्यांचा आणि समाजमाध्यमांचा वेगळा विचार केला. रमणा यांनी वाहिन्या आणि समाजमाध्यमांवर न्यायिक प्रक्रियेत अडथळा आणत असल्याचा गंभीर ठपका ठेवला. ही माध्यमे 'कांगारू न्यायालये' चालवितात आणि त्याचा परिणाम न्यायप्रक्रियेवर होऊ शकतो, असा त्यांचा आक्षेप होता. 'कांगारू' हा ऑस्ट्रेलियन प्राणी मोठमोठ्या उड्या घेत जातो. तशी कांगारू न्यायालये तथ्यांना तुडवत पटकन निष्कर्षाप्रत येतात. कांगारू न्यायालयाच्या संकल्पनेत केवळ मानीव निकाल नसून, अधोविश्वातील बलदंडांनी चालविलेली 'न्यायदान प्रक्रिया'ही येते. थोडक्यात, रमणा हे अशा अधोविश्वाची अप्रत्यक्ष तुलना माध्यमांशी करीत आहेत. हा अतिशय गंभीर ठपका असून, सरन्यायाधीशांनी केवळ असा ठपका ठेवून भागणार नाही. त्यांनी त्या पदावर असताना हा सामाजिक रोग बरा करण्यासाठी धाडसी आणि भविष्यवेधी पावले टाककण्याची गरज होती. तसे न्या. रमणा यांनी तसे केले आहे का, हा प्रश्न उपस्थित करता येईल. माध्यमांचा न्या. रमणा यांनी घेतलेला कडक समाचार केंद्रीय कायदेमंत्री किरण रिजिजू यांनी योग्य त्या परिप्रेक्ष्यात घेतला नाही. 'भारतातील न्यायव्यवस्था ही जगातील सर्वाधिक निष्पक्ष न्यायव्यवस्था आहे .



## आनंदी सकाळ

# ईर्ष्या : दुःखास कारण...

साम, दाम, दंड, भेद अशा सर्व मार्गांचा अवलंब करीत पुढे जाण्याची वृत्ती म्हणजेच ईर्ष्या. आत्मस्तुती करीत संतुष्ट राहणारा, दुसऱ्यांना कमी लेखणारा, प्रतिस्पर्ध्यांना संपवणारा, दुसऱ्यांना दूषण देणारा, इतरांमधील चांगुलपणा न शोधता दोष शोधणारा, आदर्श व्यक्तीच्याही गुणाकडे दुर्लक्ष करणारा माणूस इतरांचा सतत तिरस्कार करतो. तो सुखी होऊ शकत नाही; कारण त्याची प्रत्येक कृती आणि विचार नकारात्मक असतात. तो चांगले पाहू, ऐकू शकत नाही. यामुळे तो चांगल्या दृष्टी, सृष्टी व ज्ञानापासून वंचित राहतो. स्वत:बरोबरच तो दुसऱ्यांचे नुकसान करतो. प्रगतीला मुकतो. या गुणामुळे सुसंवाद संपतो. माणसाची प्रतिष्ठा आणि विवेकबुद्धी कमी होते. दु:ख आणि मनस्ताप अधिक होतो. ईर्ष्या ही समान व्यक्तींमध्ये अधिक असते. त्यात राजा, भाऊबंद, व्यापारी, उद्योजक, शेजारी, कामगार यांच्यापासून सुरू होणारी ही असंतोषाची भावना दोन राज्य, देश, धर्म, प्रांतापर्यंत पोहोचते; ज्यातून चांगले काही घडत नाही, म्हणून या मत्सरापासून चार हात लांब राहिल्यास जीवनात सुख येईल.

# आप'-केंद्र सरकार संघर्ष तीव्र !






दिल्लीत आम आदमी पक्षाचे सरकार आणि केंद्रातील मोदी सरकार यांच्यातील संघर्ष दिवसागणिक तीव्र होत चालला आहे. दिल्लीतील वन महोत्सवाच्या आयोजनात पोलिसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भलेमोठे फोटो कार्यक्रमस्थळी आणून लावले आणि आपल्या सरकारचा कार्यक्रम 'हायजॅक' केला, असा आरोप दिल्लीचे पर्यावणमंत्री गोपाल राय यांनी केला आहे. दिल्लीचे नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी या महोत्सवात एक लाख झाडे लावण्याचा मुहूर्त संयुक्तपणे करायचा, असे ४ जुलै रोजी ठरले होते. मात्र, ऐन वेळी या कार्यक्रमात मोदींचे मोठमोठे फोटो आणून लावल्याने आणि त्या फोटोंना धक्का लावल्यास कारवाई करू, अशी धमकी पोलिसांनी दिल्याने आम्ही या कार्यक्रमाला उपस्थित न राहण्याचे ठरविले, असे राय यांचे म्हणणे आहे. याशिवाय केजरीवाल यांना सिंगापूरमधील एका परिषदेला उपस्थित राहण्याची परवानगीही अद्याप केंद्र सरकारने दिलेली नाही, यावरूनही स्वत: केजरीवाल अत्यंत नाराज आहेत. आधी नायब राज्यपालांनी 'महापौर स्तरावरील या परिषदेला मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहू नये,' असे कारण सांगून केजरीवाल यांना परवानगी नाकारली होती. आता केजरीवाल यांनी परराष्ट्रमंत्र्यांना परवानगीसाठीचे पत्र पाठविले आहे. त्यांना एक ऑगस्ट रोजी या परिषदेला उपस्थित राहायचे आहे. मात्र, केंद्र सरकार आपल्याला जाणीवपूर्वक ही परवानगी देत नाही, असा त्यांचा आरोप आहे. यापूर्वी २०१९ मध्येही केजरीवाल यांना याच परिषदेला जाण्यासाठी परवानगी नाकारण्यात आली होती. तेव्हा अखेर त्यांनी या परिषदेत 'ऑनलाइन' सहभाग घेतला होता. आताही पुन्हा त्यांच्यावर तशीच वेळ येते की काय, हे पाहायचे. दिल्ली सरकारमधील एक मंत्री सत्येंद्र जैन यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली केंद्रीय यंत्रणांनी यापूर्वीच अटक केली आहे. आता दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया हेही केंद्रीय यंत्रणांच्या रडारवर आहेत. दिल्लीतील 'उत्पादन शुल्क धोरणा'बाबत त्यांची चौकशी केली जाण्याचा व त्यांना अटक करण्याचा कट केंद्राकडून रचला जात आहे, असा आरोप 'आप'कडून केला जात आहे. दिल्लीत सरकार 'आप'चे असले, तरी ते पूर्ण राज्य नाही. तेथील पोलिस केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत येतात. शिवाय नायब राज्यपालांच्या रूपाने केंद्राचा प्रतिनिधी 'हस्तक्षेपा'साठी हजर आहेच. त्यामुळे भविष्यात 'आप' आणि केंद्र सरकार यांच्यातील हा संघर्ष वाढतच जाईल, अशी चिन्हे दिसत आहेत.

# देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर आदिवासी महिला आरूढ

**शेजारी राष्ट्रांमध्ये राजकीय पडझड दिसत असताना भारतीय लोकशाहीची सशक्त वाटचाल म्हणून नव्या राष्ट्रपतींच्या निवडणुकीकडे बघता येईल.**

ओडिशाच्या अगदी छोट्या गावातील आदिवासी कुटुंबात जन्मलेल्या द्रौपदी मुर्मू देशाच्या पंधराव्या राष्ट्रपती असतील. गुरुवारी झालेल्या निवडणुकीत सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मुर्मू यांनी विरोधी पक्षांच्या यशवंत सिन्हा यांचा मोठ्या मताधिक्क्याने पराभव केला. मुर्मू यांचे घवघवीत यश तसे अपेक्षितच होते.

निवडणुकीत ९९ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. विरोधकांची मते फुटली. देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर आदिवासी महिलेचे आरूढ होणे हा सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे. प्रतिभाताई पाटील यांच्यानंतर राष्ट्रपतीपदी दुसऱ्यांदा महिलेला संधी मिळाली. अनुसूचित समुदायातून के. आर. नारायणन आणि रामनाथ कोविंद यांनी हे पद भूषविले आहे. गावखेड्यातील एका कनिष्ठ शिक्षिकेला राष्ट्रपती बनण्याचा मान मिळणे, यातच भारतीय लोकशाहीचा सर्वांगसुंदर पैलू दडला आहे. ओडिशाची राजधानी



भुवनेश्वरपासून अडीचशे किलोमीटर अंतरावरील मयूरभंज जिल्हा आहे. त्यातील अपरबेडा या आदिवासीबहुल परिसरातील 'द्रौपूदीदी' पुढे राष्ट्रपती हे बिरुद लागणे, हा अंत्योदयाच्या संकल्पनेचाही प्रातिनिधिक विजय ठरतो. मुर्मू यांच्या आयुष्याला सुखदु:खांचे अनेक कवडसे आहेत. त्यांचे पती बँकेत होते.

पती आणि दोन मुलांच्या मृत्यूनंतरही त्या राजकारणात प्रामाणिक वाटचाल करीत राहिल्या. वडीलबंधूंच्या मृत्यूनंतर मुर्मू यांनी त्यांच्या संसाराचीही जबाबदारी घेतली. मुर्मू यांची मुलगी बँकेत काम करते. झारखंडच्या राज्यपाल म्हणूनही मुर्मू यांनी संयमी पण तडफदार छाप उमटवली. आदिवासींच्या जमिनी सरकारने ताब्यात घेण्याविषयीच्या विधेयकावर त्यांनी संमतीची मोहोर उमटविली नाही. आपली भूमिका त्यांनी तेव्हा भाजपच्या केंद्रातील नेत्यांनाही समजावून दिली. सरकारला ती मान्य करावी लागली. आतापर्यंतच्या १४ राष्ट्रपतींपैकी राजेंद्र प्रसाद यांचा कार्यकाळ सर्वाधिक १२ वर्षे होता. झाकीर हुसेन यांना सर्वांत कमी दोन वर्षांचा काळ लाभला. मावळते राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी मीराकुमार यांचा पराभव केला होता. काल पराभूत झालेले विरोधी उमेदवार यशवंत सिन्हाही अभ्यासू आहेत. भारतात नऊ राज्यांमध्ये विधान परिषद आहे. मात्र, परिषदेच्या सदस्यांना राष्ट्रपती निवडणुकीसाठी मताचा अधिकार नसतो. लोकांमधून निवडून आलेले लोकसभा आणि विधानसभेतील लोकप्रतिनिधी मतदानात भाग घेतात. राज्यसभेच्या प्रतिनिधींनाही मतदानाचा हक्क असतो. म्हणूनच राष्ट्रपतींना जनतेचा चेहरा म्हटले जाते. येत्या सोमवारी सामान्यांच्या प्रतिनिधी राष्ट्रपती भवनाची सूत्रे स्वीकारतील.

## ।। अभंगवाणी ।।



तेलनीशीं रुसला वेडा ।
रागें कोरडें खातो भिडा ॥१॥
आपुलें हित आपण पाही ।
संकोच तो न धरी कांहीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### गडचिरोली : वाघाच्या हल्ल्यात एक ठार

।गडचिरोली। महाईन्यूज।



शहरापासून १० किलोमीटर अंतरावरील दीबणा या गावामध्ये आज, मंगळवारी दुपारी जंगलात गेलेल्या एका व्यक्तीला वाघाने ठार केले. मृताचे नाव नीलकंठ मोहुरले (५२) असून ते लाकडे तोडण्याकरिता जंगलात गेले होते.

वाघाने हल्ला केल्याची माहिती मिळताच वन विभागाची यंत्रणा आणि पोलिस विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहचलेले होते. घटनास्थळ पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सामान्य रुग्णालय गडचिरोली येथे पाठवण्यात आलेला आहे. वन विभागातर्फे जंगलात जाण्याकरिता वारंवार मनाई असताना सुद्धा लोकांनी घर कामासाठी लाकूड आणण्याकरिता, सरपण तोडण्याकरिता व अनेक प्रकारच्या रानभाज्या आणून विकण्याकरिता जंगलात जाणे सुरूच ठेवले आहे. त्यामुळे आता वाघांचे हल्ल्यापासून लोकांचे संरक्षण कसे करावे, अशा प्रश्न वन विभागासमोर उभा ठाकला आहे.

# “शिवसेनेचं नाव व चिन्ह गोठवून हिंदुत्ववादी मतं एका पेटीत आणण्याचा भाजपाचा डाव”!

### धनुष्यबाण आणि 'शिवसेना' नावासाठी शिंदे गट आणि ठाकरे गटात वाद सुरू असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाणांचं मोठं विधान

।मुंबई। महाईन्यूज।

मागील काही दिवसांपासून शिवसेना पक्षात अंतर्गत कलह सुरू आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे शिवसेना पक्षाला खिंडार पडलं आहे. शिवसेनेचे बहुसंख्य आमदार शिंदे गटात सामील झाल्याने मूळ शिवसेना कुणाची? शिवसेनेचं चिन्ह धनुष्यबाण कुणाचं? याबाबत शिवसैनिक आणि सामान्य जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. हे प्रकरण आता निवडणूक आयोगाकडे गेलं आहे.

धनुष्यबाण आणि 'शिवसेना' नावासाठी शिंदे गट आणि ठाकरे गटात वाद सुरू असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी मोठं विधान केलं आहे.

शिवसेनेचं नाव आणि चिन्ह गोठवून सर्व हिंदुत्ववादी मतं एका पेटीत आणण्याचा भाजपाचा डाव असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. ते सातारा येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. सध्याच्या राजकीय स्थितीबद्दल बोलताना पृथ्वीराज




धनुष्यबाण आणि 'शिवसेना' नावासाठी शिंदे गट आणि ठाकरे गटात वाद सुरू असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी मोठं विधान केलं आहे. शिवसेनेचं नाव आणि चिन्ह गोठवून सर्व हिंदुत्ववादी मतं एका पेटीत आणण्याचा भाजपाचा डाव असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. ते सातारा येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. सध्याच्या राजकीय स्थितीबद्दल बोलताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, “महाराष्ट्रात मुदतपूर्व निवडणुकांची शक्यता नाकारता येणार नाही. कारण सरकार स्थापन करण्यामध्ये प्रचंड वाद निर्माण होईल किंवा वाद उद्भवेल, अशी भीती मला वाटते. त्यामुळे नाइलाजानं त्यांना मुदतपूर्व निवडणुकीचं पाऊल उचलावं लागेल.

चव्हाण म्हणाले, “महाराष्ट्रात मुदतपूर्व निवडणुकांची शक्यता नाकारता येणार नाही. कारण सरकार स्थापन करण्यामध्ये प्रचंड वाद निर्माण होईल किंवा वाद उद्भवेल, अशी भीती मला वाटते. त्यामुळे नाइलाजानं त्यांना मुदतपूर्व निवडणुकीचं पाऊल उचलावं लागेल.

सध्या निवडणूक आयोगासमोर खरी शिवसेना कोणती? हा वाद सुरू झाला आहे. विधानसभा आणि लोकसभेचं चित्र स्पष्ट आहे. पण संघटनेच्या पातळीवर जे शाखाप्रमुख आहेत, जिल्हाप्रमुख आहेत, बाकी पदाधिकारी आहेत, त्यांची काय परिस्थिती आहे, यावर निवडणूक आयोगाला निर्णय घ्यावा लागेल.”

“पण एक विश्लेषक म्हणून वैयक्तिक मत सांगू इच्छितो की, यामध्ये भाजपाचा एकमेव उद्देश असा आहे की, शिवसेनेचं नाव आणि चिन्ह गोठवायचं आणि याचा फायदा घ्यायचा. शिवसेना आणि भाजपात विभागलेली हिंदुत्ववादी मतं एका पेटीत आणायची, हा त्यांचा (भाजपाचा) डाव आहे. त्यामुळे येत्या काळात शिवसेनेचं चिन्ह गोठवलं तर मला आश्चर्य वाटणार नाही. पण जो निर्णय घ्यायचा आहे, तो निवडणूक आयोग घेईल” असं विधान पृथ्वीराज चव्हाण यांनी केलं आहे.

काँग्रेसचे काही आमदारही फुटण्याची शक्यता आहे, या चर्चेबद्दल विचारलं असता चव्हाण म्हणाले, “मला एवढंच माहीत आहे की, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राहिलेली शिवसेना यांच्यातील आमदार फोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी साम-दाम-दंड-भेदचा वापर केला जात आहे. त्यामुळे सावध राहिलं पाहिजे असं मी माझ्या पक्षश्रेष्ठींना सांगितलं आहे.”

# उद्धव ठाकरेंच्या 'वडील चोरायला निघाले' टीकेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं उत्तर

## बाळासाहेब हे आम्हाला कुटुंबप्रमुखाप्रमाणे होते ते आमच्या वडिलांसारखेच होते -शिंदे

।मुंबई ।महाईन्यूज।

निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष संघटनेतील बहुमत येत्या ८ ऑगस्टपर्यंत कागदोपत्री सिद्ध करा, असे निर्देश शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहेत. यावरुन आता उद्धव ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतल्याचं पहायला मिळत आहे. प्रवक्ते संजय राऊत यांच्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर टीका करताना,'वडील आणि पक्ष चोरायला निघाले, तुम्ही मर्द नव्हे तर दरोडेखोर' असा टोला लगावला आहे. माजी मुख्यमंत्र्यांच्या या टीकेला विद्यमान मुख्यमंत्र्यांनी काही तासांमध्येच उत्तर देताना, बाळासाहेब हे आम्हाला कुटुंबप्रमुखाप्रमाणे होते ते



आमच्या वडिलांसारखेच होते असं म्हटलं. खासदार अरविंद सावंत यांच्या मुंबईतील शिवडी येथील शिवसेना शाखेचे उद्घाटन रविवारी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. यानिमित्त शक्तिप्रदर्शन करण्यात आले. यावेळी उद्धव ठाकरेंनी शिंदे गटावर टीका केली. हिंमत असेल तर माझ्या वडिलांचा फोटो न लावता निवडणूक लढवा. ही बंडखोरी नव्हे तर हरामखोरी आहे, अशा शब्दात उद्धव यांनी शिंदे गटावर निशाणा साधला. याच टीकेवरुन वांद्रे येथील रंगशारदा सभागृहाबाहेर पत्रकारांनी एकनाथ शिंदेंना प्रश्न विचारला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत धनगर मेळावा आणि सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमानंतर दिल्लीला रवाना होण्यापूर्वी शिंदे यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या संदर्भाने केलेल्या टीकेला उत्तर दिलं.

### उद्धव काय म्हणाले?

“त्यांना शिवसेनेला संपवायचे आहे. पण ठाकरे आणि शिवसेना हे नाते घट्ट राहणार. तुमच्या कित्येक पिढ्या उतरल्या तरी त्यांना पाताळात गाडून आम्ही येऊ. त्यांना शिवसेना आणि ठाकरे हे नाते तोडायचे आहे. ही बंडखोरी नाही. ही हरामखोरी आहे. हा नमकहरामीपणा आहे. एवढीच मर्दुमकी असेल तर माझ्या वडिलांचा म्हणजेच शिवसेनाप्रमुखांचा फोटो लावू नका. हिंमत असेल तर स्वतःच्या नावाने मतं मागा,” असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला दिले.“तुम्हाला वडील चोरायचे आहेत. पक्षही चोरायला निघाले आहात. तुम्ही कसले मर्द आहात. अशा लोकांच्या हातात महाराष्ट्र, मुंबई आणि तुमचे आयुष्ये देणार आहात का? न्यायालयात खटला सुरु आहे. न्यायदेवतेवर आमचा विश्वास आहे. त्यांनी आम्हीच खरी शिवसेना आहोत असे निवडणूक आयोगाला सांगितले आहे. पण हे सगळं कारस्थान आहे, त्याला जल्लोषाने उत्तर देऊन चालणार नाही. मला प्रत्येक पदाधिकाऱ्याचे शपथपत्र हवे आहे. माझ्यासह गटप्रमुखाचे शपथपत्र पाहिजे,” असं उद्धव म्हणाले होते.


### शिंदे काय म्हणाले?

वडील चोरण्याचं वक्तव्य करत उद्धव यांनी केलेल्या टीकेवरुन शिंदेंना प्रश्न विचारण्यात आला असताना त्यांनी बाळासाहेब ठाकरे हे बंडखोरांसाठी वडिलांप्रमाणेच असल्याचं म्हटलं. “मला या बाबतीत कोणावरही टीका करायची नाही. बाळासाहेबांच्या हिंदुत्वाचे विचार आम्ही पुढे घेऊन चाललोय.त्या विचारांना आम्ही पुढे नेतोय हे महाराष्ट्रातील जनतेनं स्वीकारलं आहे. त्यामुळेच आम्हाला राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून आणि तालुक्यांमधून येऊन लोक समर्थन देत आहेत,” असं शिंदे म्हणाले.

“आम्ही बाळासाहेबांच्या विचारांची जी भूमिका घेतलेली आहे ती राज्याला पुढं घेऊन जाईन, एवढेच मी या प्रसंगी सांगतो बाळासाहेब आमचे कुटुंबप्रमुख होते. शिवसेनेकडे ते कुटुंब म्हणून पाहत होते. म्हणून आम्ही त्यांच्याकडे कुटुंबप्रमुख या नात्याने पाहतोय. बाळासाहेब एक महापुरुष होते. त्यांच्या आशीर्वादामुळेच हे सरकार स्थापन झालेलं आहे,” असंही शिंदे म्हणाले. “हे सरकार अडीच वर्षापूर्वीच स्थापन व्हायला पाहिजे होते. त्याची दुरुस्ती आता आम्ही केलीय. निवडणुकपूर्व युती केली होती. त्यावेळेस शिवसेना-भाजपा युतीचे सरकार अडीच वर्षांपूर्वीच स्थापन करायला पाहिजे होतं.

## शॉर्ट न्यूज »

### मनी लॉण्ड्रिंग प्रकरणी फारुख अब्दुल्लांना कोर्टाची नोटीस



।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

भ्रष्टाराचारविरोधात सक्तवसुली संचलनालयाची (ईडी) धडक कारवाई सुरूच आहे. पश्चिम बंगालच्या शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणी चारच दिवसांपूर्वी ममता बॅनर्जी यांचे कॅबिनेट मंत्री पार्थ चॅटर्जी यांना ईडीने अटक केली. आता नॅशनल कॉन्फरन्सचे जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्याविरोधात ईडीने मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी न्यायालयात २७ ऑगस्टला हजर होण्याबाबत त्यांच्यासह इतरांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. जम्मू-काश्मीर क्रिकेट असोसिएशनमधील (जेकेसीए) कथित कोट्यवधींच्या गैरव्यवहारप्रकरणी हे आरोपपत्र

## शिंदे गटासोबत संघर्ष सुरू

# उद्धव ठाकरेंना सुप्रीम कोर्टाचा मोठा दिलासा!

### शिवसेनेत वर्चस्व कोणाचे आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हावर अधिकार कोणाचा

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेनेत वर्चस्व कोणाचे आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हावर अधिकार कोणाचा, या दोन मुद्द्यांवरील निवडणूक आयोगापुढील सुनावणीला शिवसेनेने आक्षेप घेतला आहे

शिवसेनेत वर्चस्व कोणाचे आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हावर अधिकार कोणाचा, या दोन मुद्द्यांवरील निवडणूक आयोगापुढील सुनावणीला शिवसेनेने आक्षेप घेतला आहे. निवडणूक आयोगाच्या सुनावणीला स्थगिती देण्याची विनंती करणारा अर्ज शिवसेनेने सुप्रीम कोर्टात दाखल केला आहे. सुप्रीम कोर्टाने हा अर्ज मान्य केला असून सुनावणीची तयारी दर्शवली आहे. यामुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना मोठा दिलासा मिळाला आहे. १ ऑगस्टला याप्रकरणी सुनावणी होणार आहे. याचवेळी सुप्रीम कोर्टात शिवसेना आणि शिंदे गटाकडून दाखल इतर याचिकांसंबंधीही सुनावणी होणार आहे. पक्ष संघटनेतील वर्चस्व सिद्ध करण्यासाठी ८ ऑगस्टपर्यंत कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने शिंदे गट आणि शिवसेनेला दिले आहेत. मात्र, अशा पद्धतीने कागदपत्रांची मागणी करणे हा न्यायालयाच्या 'जैसे थे' आदेशाचा भंग होतो, असं शिवसेनेचं म्हणणे आहे.



त्यामुळे न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या कृतीची दखल घेऊन सुनावणी स्थगित करावी, अशी मागणी शिवसेनेकडून करण्यात आली होती. त्यानुसार सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिली असून १ ऑगस्टला सुनावणी होणार आहे. सोमवारीच हा अर्ज सुप्रीम कोर्टाच दाखल करण्यात येणार होता. मात्र, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शपथविधीसाठी सरन्यायाधीश एन. व्ही. रमण सोमवारी संसद भवनात असल्यामुळे हा अर्ज मंगळवारी दाखल केला जाईल, अशी माहिती शिवसेनेचे खासदार अनिल देसाई यांनी दिली होती. शिवसेनेच्या बंडखोर आमदारांची अपात्रता व त्यासंबंधित याचिकांवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. अपात्रतेसंदर्भात कोणतीही कारवाई न करता स्थिती 'जैसे थे' ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे या प्रकरणांचा निकाल लागेपर्यंत निवडणूक आयोगाने खरी शिवसेना कोणती आणि निवडणूक चिन्हावर कोणाचा अधिकार, या मुद्द्यांवर सुनावणी घेणे योग्य नसल्याचा मुद्दा शिवसेनेच्या वतीने याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. शिवसेनेच्या ४० आमदारांनी तसेच, लोकसभेतील १२ खासदारांनी बंडखोरी केली आहे. मात्र, ही बंडखोरी नसून, आमचा पक्ष खरी शिवसेना आहे, असा दावा शिंदे गटाने केला आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शिंदे गट आणि भाजप युती सरकारला शपथही दिली आहे. लोकसभाध्यक्षांनीही १२ खासदारांच्या बहुमताच्या पाठिंब्यावर गटनेता बदलण्यासही मान्यता दिली आणि विनायक राऊत यांच्याऐवजी राहुल शेवाळे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर शिंदे गटाने निवडणूक आयोगाकडे धाव घेत निवडणूक चिन्हावर हक्क सांगितला होता.

# भारत नेहमीच तुमच्यासोबत..!


## पीएम मोदींचं श्रीलंकेच्या राष्ट्रपतींना पत्र

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांना पत्र लिहित त्यांचे अभिनंदन केले आहे. गेल्या आठवड्यात रानिल विक्रमसिंघे यांनी श्रीलंकेत आर्थिक अडचणीच्या पार्श्वभूमीवर शपथ घेतली. यावेळी पीएम मोदींनी पत्र पाठवत त्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच भारत नेहमीच श्रीलंकेच्या पाठीशी उभा असल्याचे मोदींनी सांगितिले आहे.

यापूर्वी माजी राष्ट्रपती गोतबाया राजपक्षे यांनी देश सोडल्यानंतर शेजारील देशात लोकांनी जोरदार हिंसक निदर्शने केली. गोतबाया राजपक्षे यांच्या राजीनाम्यानंतर संसदेत झालेल्या मतदानादरम्यान रानिल विक्रमसिंघे यांना १३४ मतं





मिळाली. रानिल विक्रमसिंघे यांनी गेल्याच आठवड्यात श्रीलंकेत प्रचंड विरोध होत असताना राष्ट्रपतीपदाची शपथ घेतली होती. तसेच त्यांनी श्रीलंकेचे पंतप्रधान म्हणून काम पाहिले होते. विक्रमसिंघे यांची श्रीलंकेचे हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. श्रीलंका गेल्या अनेक महिन्यांपासून सर्वात वाईट संकटातून जात आहे. त्यामुळे अनेकवेळा देशात हिंसक आंदोलनही करण्यात आलं.

श्रीलंकेच्या पंतप्रधानपदी ज्येष्ठ राजकीय नेते दिनेश गुणवर्धने विराजमान झाले आहेत. त्यांनी आज कोलंबोमधील फ्लॉवर रोडवरील पंतप्रधान कार्यालयात पंतप्रधान पदाची शपथ घेतली. तर रानिल विक्रमसिंघे यांनी राष्ट्रपती पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. दरम्यान दिनेश गुणवर्धने यांनी २२ जुलै रोजी श्रीलंकेच्या पंतप्रधान पदाची सूत्रं हाती घेतली आहेत.

गोतबाया राजपक्षे यांनी श्रीलंका सोडून पलायन केल्यानंतर ७३ वर्षीय रानिल विक्रमसिंघे यांनी देशाचे आठवे राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली.

माजी राष्ट्रपती गोतबाया राजपक्षे यांनी देश सोडल्यानंतर शेजारील देशात लोकांनी जोरदार हिंसक निदर्शने केली. गोतबाया राजपक्षे यांच्या राजीनाम्यानंतर संसदेत झालेल्या मतदानादरम्यान रानिल विक्रमसिंघे यांना १३४ मतं मिळाली. रानिल विक्रमसिंघे यांनी गेल्याच आठवड्यात श्रीलंकेत प्रचंड विरोध होत असताना राष्ट्रपतीपदाची शपथ घेतली होती. तसेच त्यांनी श्रीलंकेचे पंतप्रधान म्हणून काम पाहिले होते. विक्रमसिंघे यांची श्रीलंकेचे हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. श्रीलंका गेल्या अनेक महिन्यांपासून सर्वात वाईट संकटातून जात आहे.

# प्लास्टिकचा थर असलेल्या उत्पादनांवर राज्यात बंदी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्लास्टिक बंदी नियमामध्ये सुधारणा करण्याचे निर्देश

।नवी दिल्ली ।z महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

प्लास्टिक लेपीत आणि प्लास्टिकचा थर असलेल्या उत्पादनांवर बंदी घालण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्यातील प्लास्टिकच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर समस्या लक्षात घेता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्लास्टिक बंदी नियमामध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

केंद्र शासनाने १ जुलै २०२२ पासून सिंगल युज प्लास्टिक वर बंदी घातली असून राज्यात या बंदीची काटेकोर



अंमलबजावणी करण्याच्या सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या आहेत. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे महाराष्ट्र हे सिंगल युज प्लास्टिक बंदी करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे. राज्यात प्लास्टिक बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एक शक्तिप्रदत्त समिती नेमण्यात आली होती. या समितीने ७ जुलै २०२२ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकॉल उत्पादने अधिसूचना २०१८ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला होता.

## “त्याच्यासोबत इंटिमेट सीन करताना...” दिशा पटानीने सांगितलं चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान नेमकं काय घडलं?



अभिनेत्री दिशा पटानीने चित्रपटासाठी इंटिमेट सीन चित्रीत करण्याचा अनुभव सांगितला आहे. दिशा पटानी अर्जुन कपूर तारा सुतारिया आणि जॉन अब्राहम सध्या ‘एक विलन रिटर्न्स’ चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहेत. या चित्रपटामध्ये दिशा-जॉनचे बोल्ड सीन प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत. पण चित्रपटामध्ये इंटिमेट सीन करताना दिशाला नेमका काय अनुभव आला? हे नुकत्याच एका कार्यक्रमामध्ये तिने सांगितलं. दिशा-जॉनने एका प्रमोशनल कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यावेळी इंटिमेट सीन चित्रीत करणं एक मुलगी म्हणून कितपत कठीण असतं? असा प्रश्न दिशाला विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देत तिने जॉनचं यावेळी भरभरुन कौतुक केलं. तिला चित्रपटामधील इंटिमेट सीन चित्रीत करण्यासाठी चित्रपटाच्या टीमचीही उत्तम साथ मिळाली. दिशा म्हणाली, “मी हा सीन जॉन अब्राहमबरोबर केला आहे. त्याच्याबरोबर इंटिमेट सीन करणं माझ्यासाठी फार कठीण नव्हतं. जॉन आणि दिग्दर्शक मोहित सुरी यांनी सीन चित्रीत करत असताना मला योग्य वाटत आहे की नाही याची खूप काळजी घेतली. खरं सांगायचं झालं तर मला याबाबत कोणतीच तक्रार नाही.”

‘एक विलन रिटर्न्स’ हा एक सस्पेन्स थ्रिलर चित्रपट आहे. ड्रामा, रोमान्स आणि ॲक्शन प्रेक्षकांना या चित्रपटाच्यानिमित्ताने अनुभवायला मिळणार आहे. दिशा, अर्जुन, तारा, जॉन पहिल्यांदाच या चित्रपटाच्यानिमित्ताने रुपेरी पडद्यावर एकत्र आले आहेत.

# ‘समायरा’ उलगडणार एका असाधारण प्रवासाची गोष्ट

ध्येयापर्यंतचा हा असाधारण प्रवास आपल्याला या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

ऋषी श्रीकृष्ण देशपांडे दिग्दर्शित ‘समायरा’ या चित्रपटाची नुकतीच सोशल मीडियावर घोषणा करण्यात आली असून येत्या २६ ऑगस्ट रोजी ‘समायरा’ प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पोस्टरमध्ये केतकी नारायण अव्हेंजर चालवताना दिसत असून तिच्या चेहऱ्यावर एक ध्येय साध्य करण्याचा आत्मविश्वास




दिसत आहे. तिच्या ध्येयापर्यंतचा हा असाधारण प्रवास आपल्याला या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.


‘समायरा’चे दिग्दर्शक ऋषी देशपांडे म्हणतात, ”प्रत्येक जण आयुष्य जगण्यासाठी एक प्रवास करत असतो. तसाच एक असाधारण प्रवास ‘समायरा’चाही असणार आहे. तिचा हा प्रवास तिचे ध्येय साध्य करणार का, हे लवकरच प्रेक्षकांना कळणार आहे. सध्या मराठी चित्रपटसृष्टीत अनेक नवनवीन विषय हाताळले जात आहेत. ही कथाही खूप वेगळी आहे. ‘समायरा’चा हा प्रवास प्रेक्षकांना नक्कीच सकारात्मकता देईल.”

ग्लोबल सेवा एलएलपी प्रस्तुत, अद्योत फिल्म्सच्या सहयोगाने, या चित्रपटाची निर्मिती डॉ. जगन्नाथ सुरपूरे, रतन सुरपूरे, शशिकांत पनत, योगेश आळंदकर आणि ऋषी श्रीकृष्ण देशपांडे यांनी केली असून या चित्रपटाची पटकथा आणि संवाद सुमित विलास तांबे यांचे आहेत.

# “...तुमची मानसिकता बदला”,लठ्ठपणावरून ट्रोल करणाऱ्यांची दिव्यांकाने केली बोलती बंद

‘ये रिश्ता या कहलाता है’ या मालिकेतून अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठी घराघरात पोहचली. मालिकेनंतर रियॅलिटी शो ‘खतरों के खिलाडी’मधून दिव्यांकाचा बेधडक अंदाज पाहायला मिळाला. सध्या दिव्यांकाने छोट्या पडद्यावरून ब्रेक घेतला असला तरी ती सोशल मीडियावर चांगलीच सक्रिय असते. नुकताच दिव्यांकाने तिचा एक डान्स व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर केला होता. या व्हिडीओवरून दिव्यांकाला काही नेटकऱ्यांनी ट्रोल केलं. तर दिव्यांकानेही बॉडी शेमिंगवरून ट्रोल करणाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केली आहे.

दिव्यांकाने नुकताच शेअर केलेल्या व्हिडीओत ती डान्सची मजा लुटताना दिसतेय. दिव्यांकाच्या या व्हिडीओवर मात्र काही



नेटकऱ्यांनी कमेंट करत तिला ट्रोल करण्याचा प्रयत्न केला आहे. दिव्यांका गरोदर असल्याचं काही युजर म्हणाले तर काहींनी तिच्या पोटावर आणि लठ्ठपणावर कमेंट केल्या आहेत.

## सैनिक बांधवांच्या पराक्रमामुळे...”, अभिनेत्री सोनाली कुलकर्णीची भारतीय जवानांसाठी खास पोस्ट

मराठी चित्रपटसृष्टीची ‘अप्सरा’ अर्थातच अभिनेत्री सोनाली कुलकर्णी ही नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असते. सध्या ती तिच्या आगामी तमाशा लाईव्ह या चित्रपटामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी तिचा हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटातील तिच्या भूमिकेचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

सोनाली ही तिच्या कामात व्यस्त असली तरी ती तिच्या कुटुंबासाठी वेळात वेळ काढत असते. नुकतंच सोनालीने भारतीय जवानांसाठी एक अभिमानास्पद पोस्ट शेअर केली आहे.

सोनाली कुलकर्णी ही सोशल मीडियावर कायमच चर्चेत असते. सोनालीने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. तिची ही पोस्ट कारगिल विजय दिवस यानिमित्ताने आहे. आज २६ जुलै म्हणजेच कारगिल विजय दिवस. हा दिवस सैनिकांच्या शौर्याचं, बलिदानाचं प्रतीक म्हणून बघितला जातो. याच निमित्ताने सोनालीने एक पोस्ट शेअर केली आहे.




यात तिने तिच्या वडिलांचा जुना फोटो पोस्ट केला आहे. त्याला कॅप्शन देताना तिने भारतीय सैन्याच्या अभूतपूर्व कामगिरीला सलाम केला आहे. सोनालीने शेअर केलेल्या या फोटोत तिचे वडील दिसत आहेत. “आज कारगिल विजय दिवस. मला अभिमान आहे माझ्या बाबांचा आणि त्या सर्व सैनिक बांधवांचा ज्यांच्या पराक्रमामुळे आपण हा दिवस साजरा करत आहोत”, असे तिने या फोटोला कॅप्शन देताना म्हटले आहे. त्यासोबत तिने जय जवान, भारत माता की जय, जयहिंद यांसह अनेक हॅशटॅगही वापरले आहेत. सोनालीने शेअर केलेली ही पोस्ट सध्या चांगलीच व्हायरल होत आहे. दरम्यान अभिनेत्री सोनाली कुलकर्णीच्या वडिलांचे नाव मनोहर गणपतराव कुलकर्णी असे आहे. ते सैन्यदलातून निवृत्त झालेले डॉक्टर असून त्यांनी सैन्याच्या वैद्यकीय दलात ३० वर्षे काम केले आहे. ते त्यांच्या पत्नीसह पुण्यातील निगडी, प्राधिकरण परिसरात वास्तव्यास आहेत.

## मराठी-जपानी चित्रपटात दिसणार ललित-मृण्मयी

मराठी भाषेतील कथा आणि जपानमधील चित्रीकरण असा सुंदर योग ‘तो, ती आणि फुजी’ या चित्रपटाच्या निमित्ताने जुळून आला आहे. भारत आणि जपान अशा दोन देशांमध्ये चित्रित होणाऱ्या या चित्रपटात अभिनेता ललित प्रभाकर आणि अभिनेत्री मृण्मयी गोडबोली ही जोडी पुन्हा नायक-नायिकेच्या भूमिकेत एकत्र दिसणार आहे.

‘तो, ती आणि फुजी’ या चित्रपटाची पटकथा लेखिका इरावती कर्णिक यांनी लिहिली असून ‘मीडियम स्पाईसी’ या चित्रपटाद्वारे दिग्दर्शनात पदार्पण करणारा मराठी, हिंदी रंगभूमीवरचा प्रसिध्द दिग्दर्शक मोहित टाकळकर याने केले आहे. एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेले दोन प्रेमी, विवाहानंतर त्यांच्या नात्यात आलेली



कटुता आणि एकमेकांपासून विभक्त झाल्यानंतर सात वर्षांनी जपानमध्ये झालेली दोघांची पुनर्भेट, अशी या चित्रपटाची सर्वसाधारण कथा आहे.

## शॉर्ट न्यूज »

### मास्टरकार्ड घेणार पेटीएमची जागा!

चेन्नई । महाईन्यूज

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) मास्टरकार्डसोबत शीर्षक प्रायोजकत्वासाठी करार केला आहे. त्यामुळे येत्या सप्टेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या मालिकेपासून भारतीय संघाचा शीर्षक प्रायोजक पेटीएमऐवजी मास्टरकार्ड असेल. विशेष म्हणजे, पेटीएमने स्वत: आपले सर्व अधिकार मास्टरकार्डला देण्याची विनंती बीसीसीआय केली होती होती. पेटीएमची ही विनंती बीसीसीआयने मान्य केली आहे. २०१९ मध्ये, बीसीसीआयने आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेट सामन्यांसाठी पेटीएमचे शीर्षक प्रायोजकत्व चार वर्षांसाठी वाढवले होते. त्यासाठी पेटीएमला २०१९ ते २०१३ या काळासाठी ३२६.८० कोटी रुपये बीसीसीआयला देणे होते. २०१९ पासून प्रत्येक सामन्यासाठी पेटीएम ३.८० कोटी रुपये खर्च करत होते.

# लेजेंड्स क्रिकेट लीगचे दुसरे पर्व भारतात होणार!

## 'हे' भारतीय खेळाडू खेळण्यासाठी सज्ज

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।




जागतिक टी-20 लीग लेजेंट्स लीगच्या दुसऱ्या पर्वाचे आयोजन लवकरत केले जाणार आहे. लेजेंड्स क्रिकेट लीगचे दुसरे पर्व भारतात होणार असून, भारताचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफ (MOHAMMAD KAIF) आणि माजी वेगवान गोलंदाज आरपी सिंह (RP SINGH) खेळताना दिसणार आहे.

लेजेंड्स लीगच्या दुसऱ्या पर्वात खेळण्याचा दोन्ही खेळाडूंनी निर्णय घेतला आहे. या बहुचर्चित लीगमध्ये जगभरातील दिग्गज क्रिकेटपटू खेळणार आहेत. याशिवाय, ऑस्ट्रेलियाचा ब्रेट ली, दक्षिण आफ्रिकेचा डेल स्टेन, जॅक कॅलिस, ऑस्ट्रेलियाचा शेन वॉटसन, श्रीलंकेचा मुथय्या मुरलीधरन, चामिंडा वास, इंग्लंडचा मॉँटी पानेसर आणि भारताचा वीरेंद्र सेहवाग, इरफान पठाण, युसूफ पठाण, एस.बा. स्टुअर्ट बिन्नीसारख्या दिग्गज खेळाडूंना गेल्या आठवड्यात लीगमध्ये जोडले होते. मला विश्वास आहे, चाहत्यांच्या त्यांच्या आवडत्या क्रिकेटपटूला मैदानात पाहायला आवडेल. लेजेंड्स लीगच्या पहिल्या हंगामात आम्ही स्पर्धात्मक क्रिकेटर पाहिले. तसेच दुसऱ्या हंगामात उत्कृष्ट खेळाडूंचा सहभाग पाहण्यासाठी आम्ही उत्सुक आहेत", असे लेजेंड्स लीग क्रिकेटचे सह संस्थापक आणि सीईओ रमण रहेजा यांनी म्हटले.

दरम्यान, लेजेंड्स क्रिकेट लीगचे दुसरे पर्व भारतात खेळवले जाणार आहे. या लीगमध्ये इयान बटलर (न्यूझीलंड), मिशेल मॅक्लेनाघन (न्यूझीलंड), एल्टन चिंगुबुरा (झिम्बॉव्बे), धम्मिका प्रसाद (श्रीलंका) पारस खडका (नेपाळ), चमिंडा वास (श्रीलंका), क्रिस्टोफर मपोफू (झिम्बॉव्बे) आणि भारताचा लक्ष्मी रतन शुक्ला यासारखे खेळाडू खेळताना दिसणार आहेत.

# भारत आणि ऑस्ट्रेलिया अंतिम सामना खेळतील पण...;

## रिकी पॉंटिंगची भविष्यवाणी चर्चेत



।पोर्ट ऑफ स्पेन ।महाईन्यूज।

येत्या ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये ऑस्ट्रेलियात आयसीसी टी २० विश्वचषकाचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत ऑस्ट्रेलियाच्या माजी विश्वचषक विजेत्या कर्णधाराने मोठे विधान केले आहे. यावेळी भारत आणि ऑस्ट्रेलिया टी २० विश्वचषकाचा अंतिम सामना खेळतील, असे रिकी पॉंटिंग म्हणाला आहे.

आयसीसीने तयार केलेल्या व्हिडीओमध्ये बोलत असताना, रिकी पॉंटिंगने अनेक पैलूंवर आपली मते मांडली. यावेळी त्याने टी २० विश्वचषक जिंकू शकतील अशा दोन संघांची नावे सांगितली. त्याच्या मते, भारत आणि ऑस्ट्रेलिया यावेळी अंतिम सामना खेळतील. अंतिम सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाकडून पराभवही स्वीकारावा लागेल, असेही तो म्हणाला. एवढेच नाही तर त्याने पाकिस्तानी संघाबद्दलही आपले मत मांडले. तो म्हणाला, "पाकिस्तानच्या संघात विश्वचषक जिंकण्याची ताकद आहे, असे मला वाटत नाही. ते शाहीन आफ्रिदी आणि त्यांच्या टॉप ऑर्डरच्या फलंदाजांवर जास्त अवलंबून आहेत. कर्णधार बाबर आझम या स्पर्धेत चांगली कामगिरी करू शकला नाही तर, पाकिस्तानचा या स्पर्धे टिकाव लागणार नाही."

रिकी पॉंटिंग ऑस्ट्रेलियाचा सर्वात यशस्वी कर्णधार आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही